# विशेष कुलमुखत्यारपत्राचे अधिप्रमाणन करणे

Authentication of special power of Attorney

## प्रक्रीया (process)

## अ. पक्षकारांकडुन करावयाची **प्रक्रीया-**

1. रुपये 100/- च्या मुद्रांक शुल्कावर, विशेष कुलमुखत्यारपत्राचा दस्त तयार करावा.
2. ज्यामध्ये दस्त नोदंणीस सादर करणे किंवा तसेच दस्तावर सही करणा-या पक्षकाराच्या वतीने नोंदणी कार्यालयात उपस्थित राहून त्याचे निष्पादन नोदंणी अधिका-यासमोर कबूल करणे या बाबींचा प्रामुख्याने समावेश करणे
3. मुखत्यारपत्र लिहुन देणार ज्या दुय्यम निबंधक यांचे कार्यक्षेत्रात रहात असेल,त्या दुय्यम निबंधकाचे कार्यालयात अधिप्रमाणनासाठी सादर करणे
4. मुखत्यारपत्रर लिहुन देणार यांनी त्यांचे निष्पादन दुय्यम निबंधक यांचेसमोर करणे
5. मुखत्यारपत्रर लिहुन देणार यांना ओळखत असलेल्या दोन ओळखदार यांना दुय्यम निबंधक कार्यालयात उपस्थित करणे
6. अधिप्रमाणन फी रुपये 25/- दुय्यम निबंधकाकडे जमा करणे

## ब. दुय्यम निबंधक कार्यालयाकडुन करावयाची **प्रक्रीया-**

1.असा मुखत्यारनामा सादर झाल्यास, मुखत्यारपत्र लिहून देणार यांची मुखत्यारपत्रावर निष्पादन करुन घेणे

2. मुखत्यारपत्र लिहून देणार यांना ओळखत असलेल्या दोन ओळखदार यांची ओळख घेणे

3. मुखत्यारपत्र लिहून देणार व ओळखदार यांचे ओळखपत्राच्या प्रती पुरावा म्हणून मूखत्यारपत्राचा भाग करून घेणे

3. अधिप्रमाणन फी रुपये 25/ इतकी जमा करुन घेणे

4.फी ची पावती पक्षकारास देणे

5.मूळ मूखत्यारपत्र पक्षकारास त्याच दिवशी 1 तासाचे आत अपवादात्मक परीस्थीतीत जास्तीत जास्त त्याच दिवशी अधिप्रमाणन करून परत देणे.

यासंबधात अधिक माहीतीकरीता, सारथी < दस्त नोंदणी < मुखत्यारपत्र < विशेष मुखत्यारपत्र पहावे.